महाराष्ट्र शासन
छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर
दसरा चौक, भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर- ४१६०१२
दुरध्वनी :- ०२३१ - २६४१५८३ | फॅक्स क्र. ०२३१-२६४४३६९ | Email - est12cprh@gmail.com

जा.क्र.छप्ररासरुको/ आस्था-१-२/रिक्तपदे/१३८२-८२/२०२६ दिनांक - २३/०२/२०२६

## थेट मुलाखत

**विषय :- छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय,कोल्हापूर येथील सहाय्यक प्राध्यापक व वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे थेट मुलाखतीद्वारे भरण्याबाबत...**

संदर्भः- १) महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र.एलईसी-१४२४/प्र.क्र.२२८/वैसेवा-३,दि.१८.०७.२०२४
२) महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र.एलईसी-१४१०/प्र.क्र.९५/वैसेवा-३, दि.०१.०७.२०१०

छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर या संस्थेत संदर्भ क्र.१ व २ च्या शासन निर्णयान्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार रिक्त असलेली सहाय्यक प्राध्यापक (३६४ दिवस ) व वैद्यकीय अधिकारी (१२० दिवस) ची पदे करार पध्दतीने भरण्याबाबत थेट मुलाखत घेण्यात येत आहे. थेट मुलाखत अधिष्ठाता कार्यालय, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शेंडापार्क, कोल्हापूर येथे दिनांक ०६.०३.२०२६ रोजी शुक्रवार दुपारी ०३.३० वा.घेण्यात येतील.

तरी इच्छूक उमेद्वारांनी शैक्षणिक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह आपला अर्ज दि.२३.०२.२०२६ ते दि.०३.०३.२०२६ अखेर छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर शेंडापार्क येथील आवक जावक विभागा मध्ये सादर करावा. तसेच उमेदवारांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, शेंडापार्क, कोल्हापूर येथे शुक्रवार, दिनांक ०६.०३.२०२६ रोजी दुपारी ०३.३० वा स्वखर्चाने उपस्थित रहावे. सदर पदे भरण्याबाबतचे नियम व अटी प्रचलीत शासन निर्णयानुसार राहतील.

### अ) सहाय्यक प्राध्यापक :- करार पध्दतीवरील ३६४ दिवसांच्या नियुक्ती करीता.

| अ.क्र. | विभाग | शैक्षणिक पात्रता | रिक्त पदे | संस्थेचे नांव |
|---|---|---|---|---|
| ०१ | हृदयरोगशस्त्रक्रिया विभाग (CVTS) | As per NMC Norms | ०२ | C.P.R.Hospital Kolhapur |
| ०२ | हृदयरोगशास्त्र विभाग (CVTC) | | ०१ | |
| ०३ | शरिरविकृतीशास्त्र विभाग (रक्तपेढी) | | ०१ | |
| | **एकूण पदे** | | **०४** | |

सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी NMC मानकांनुसार पदवी/डी.एन.बी. अर्हता धारण केलेले बंधपत्रीत उमेदवाराचा प्राधान्याने विचार केला जाईल. उमेदवाराची निवड गुणांनुक्रमे व प्रयत्न (No.of Attempts) विचारात घेऊन करण्यात येईल.

अ) शैक्षणिक अर्हता :- NMC मानकांनुसार
ब) वेतनश्रेणी :- सहाय्यक प्राध्यापक पदासाठी - **एकत्रित ठोक मासिक मानधन रु.१,००,०००/-**
**(रु.एक लाख फक्त)**

**ब) वैद्यकीय अधिकारी (Medical Officer) करार पध्दतीवरील १२० दिवसांच्या नियुक्तीकरीता :-**

| अ.क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक पात्रता | रिक्त पदे | संस्थेचे नांव |
|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ | As per NMC Norms | ०२ | C.P.R.Hospital Kolhapur |

**अ) शैक्षणिक अर्हता:-** MBBS (रुग्णसेवेची निकड व शैक्षणीक कामकाजाच्या निकडीच्या दृष्टीने बंधपत्रित पदव्युत्तर अर्हता धारक उमेदवारास प्राध्यांन्य दिले जाईल.)

**ब) वेतनश्रेणी :-** एकत्रित ठोक मासिक मानधन रु.७५,०००/- (रु.पंच्याहत्तर हजार फक्त) तसेच शैक्षणिक अर्हता पदव्युत्तर पदविका अथवा पदव्युत्तर पदवी धारण केली असल्यास रु.८५,०००/-(रु. पंच्याऐंशी हजार फक्त)

**नियम व अटी**

१) अर्जदार हा सबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुंध्द कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. नियुक्तीनंतर उमेदवारास वैद्यकीय मंडळाचे वैद्यकीय प्रमाणपत्र ३ महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.

२) सदर रिक्त पदांच्या संख्येत बदल करणे अथवा सदरची भरती प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याबाबतचे सर्व अधिकार मा. अधिष्ठाता यांना राहतील.

३) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणताही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

४) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

५) अर्जदाराची नियुक्ती संचालनालयाकडून बंधपत्रीत उमेदवार उपलब्ध होईपर्यत तात्पुरत्या स्वरुपाची असून जर शासनातर्फे निवड मंडळामार्फत/नामनिर्देशनाने/बदली अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत कायम स्वरुपाच्या उमेदवसारास रुजू करण्यांत आलेस अर्जदाराची त्या पदावरील सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

६) अर्जदार इतर कोणत्याही शासकिय/अशासकिय संस्थेत कार्यरत असल्यास त्यांनी कार्यरत असलेल्या संस्थेचे ना-हरकत(NOC) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक असेल.

७) सदर नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात असुन या पदावर आपला कोणताही अधिकार रहणार नाही तसेच याबाबत कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

८) वयोमर्यादा :- खुल्या वर्गासाठी - ३८ वर्षे (जाहिरात प्रसिद्धी दिनांका रोजी गणली जाईल)
मागासवर्गीयांसाठी - ४३ वर्षे (जाहिरात प्रसिद्धी दिनांका रोजी गणली जाईल)

९) अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच मुलाखतीवेळी सर्व मूळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. तसेच नियुक्ती झालेस पोलीस व्हेरिफीकेशन व वैद्यकीय तपासणी अहवाल सादर करणे आवश्यक राहिल.

१०) आवश्यक कागदपत्रे - १) सर्व पदवी, पदवीका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतिम वर्षाची गुणपत्रीका २) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र (लागू असल्यास) ३) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला ४)पॅन कार्ड व आधार कार्डची छायाप्रत ५) एम.एस.सी.आय.टी. संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र इ.

उमेदवारांनी विहित कालावधीत आपला अर्ज शैक्षणीक कागदपत्रांसह छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, शेंडापार्क कोल्हापूर येथील आवक विभाग (Inward) येथे जमा करावेत. तसेच थेट मुलाखत शुक्रवार, दिनांक ०६.०३.२०२६ रोजी दुपारी ०३.३० वाजता अधिष्ठाता कार्यालय, रा.छ.शा.म. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, शेंडापार्क, कोल्हापूर यांचे कक्षात होईल. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. सदरच्या जाहिरातीतील पदसंख्या बदलण्याबाबतचा अथवा सदरची जाहिरात पुर्णतः रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठातांनी राखून ठेवला आहे.

(डॉ.एस.एस.भिसे)
अधिष्ठाता,
छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर

प्रति,

१) अध्यक्ष, संकेतस्थळ विकसक, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर
   २/- सदरची जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

२) सूचना फलक, राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शेंडापार्क व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, सीपीआर आवार, कोल्हापूर. व सुचना फलक, वैद्यकिय अधिक्षक कार्यालय, छ.प्र.रा.स.रु.कोल्हापूर.

३) सर्व प्राध्यापक व विभागप्रमुख, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविदयालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर.

४) मुलांचे/मुलींचे/आवासी-निवासी वसतीगृह, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शा.वै.म., कोल्हापूर.

५) ग्रंथालय सूचना फलक, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविदयालय, कोल्हापूर

६) सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये :-
   महाविद्यालयाचे नांव :-
   (उपरोक्त अधिष्ठातांना विनंती करण्यात येते की, सदरची जाहिरात आपल्या महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावावीत.)

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-

१) मा.अप्पर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

२) मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई - १

३) मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई - १

४) मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

५) मा.उपसंचालक आरोग्य सेवा, कोल्हापूर